सं.फौ.खटला क्र.१४४/२५
सरकार / संतोष मंडले
निशाणी क्र.११

साक्षीदार क्र.१ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – शशिकांत ज्ञानू सुर्वे
वडीलांचे नाव – ज्ञानू गणू सुर्वे
वय – ६१ वर्षे
व्यवसाय – खाजगी धंदा
राहणार – खंबाळे, भाळवणी, ता. खानापूर, जि. सांगली.

**सरतपास सहा. सरकारी वकील श्री.बी.डी.काळे यांचेमार्फत शपथेवर सुरु**

१. राज्य उत्पादन शुल्क यांनी मला कोठे बोलावले होते हे मला आठवत नाही. माझ्यासमक्ष पंचनामा केला व मुद्देमाल जप्त केला असे काही घडले नाही. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर केवळ माझी सही आहे. परंतु त्यातील मजकूर मला माहिती नाही. पंचनाम्यावरील सहीस **निशाणी क्र.PW1–12** देण्यात येते.

**(साक्षीदार त्याचे पुर्व कथनांशी विसंगत उत्तरे देत असल्यामुळे सरकारी वकीलांना उलटतपासामध्ये विचारण्यात येतील अशा स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १२/११/२०२४ रोजी

पंचनाम्यासाठी नेलकरंजी येथे पंचनाम्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, एक इसम मॅक्डॉल नं.१ व देशी दारु टँगो पंच दारुच्या बाटल्या विक्री करणेच्या उद्देशाने घेवून बसल्याचे दिसला. हे म्हणणे खरे नाही की, दिसल्या परिस्थितीप्रमाणे पंचनामा केला व मी त्यावर वाचून सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या परिचयाचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.ए.डी.वसेकर यांनी नाकारला.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2026.01.03 15:20:09 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : ०३/०१/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

आटपाडी

*****